दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/१२८/२०१८
दि.०३/१०/२०१८.

<u>प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.</u>

श्री.कृष्णा सी. गुप्ता, ................अपिलार्थी
एस-१०६, पाटाडीया कॉम्प्लेक्स, जनार्दन रकवी मार्ग,
उत्तन रोड, भाईंदर (प), जि.ठाणे. ४०११०१.

जनमाहिती अधिकारी तथा, ................प्रतिवाद
आस्थापना अधिक्षक (आस्थापना)

## -: विवेचन :-

श्री.कृष्णा सी. गुप्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांचेकडे दि.१८/०८/२०१८ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

**विषयः- दि.२९/०३/२०१७ रोजी तक्रारदार श्री.मिलन म्हात्रे यांनी आपल्या कार्यालयात दाखल केलेल्या तक्रारीवर झालेल्या कार्यवाही बाबत खालील प्रमाणे माहिती द्यावेत.**

१) सदर पत्रावर आपल्या कार्यालयातून झालेल्या कार्यवाहीचा संपुर्ण तपशिलवार माहिती देण्यात यावी.
२) सदर पत्राच्या अनुषंगाने आपण केलेल्या सर्व पत्रव्यवहारांची सत्यप्रत देण्यात यावी.
३) सदर पत्र आपल्या कार्यालयात आवक (inward) झालेला आहेत त्यावर असलेले टिप्पणी, शेरा सहित त्याची सत्यप्रत देण्यात यावी.
४) आपल्या कार्यालयातून निर्गमित आदेशाची सत्यप्रत देण्यात यावी.

**<u>अपिल दाखल करण्याची कारणे:-</u>**

माहिती अधिकार अंतर्गत दि.१८/०८/२०१८ रोजीच्या पत्रान्वये माहिती दिली नसल्याने अपिलार्थी अर्जदार यांनी दि.१९/०९/२०१८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**<u>सुनावणीचा तपशिल:-</u>**

अपिलार्थी अर्जदार व आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.२९/०९/२०१८ रोजी दुपारी १२.१५ वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.आस्था/३६९/२०१८ दि.२५/०९/२०१८ अन्वये कळविण्यात आले होते.

परंतु सदर दिवशी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना) हे मा.स्थायी समिती सभेस उपस्थित असल्याने सुनावणी रद्द करण्यात आली असुन सदर सुनावणी दि.०३/१०/२०१८ रोजी दुपारी १२.३० वाजता आयोजित करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने

अपिलार्थी अर्जदार व जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांना जा.क्र.मिभामनपा/उपआ.आस्था/३७३/२०१८ दि.२९/०९/२०१८ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) हे व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

१) **अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद**:- माहिती अधिकार अंतर्गत मला जाणूनबुजून माहिती दिलेली नाही.

२) **जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-** माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

## -: निर्णय :-

१) जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांनी अपिलार्थी अर्जदारास १० दिवसांत विनाशुल्क माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. वरील निर्देश देऊन अपिल निकाली काढण्यात आले.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

(विजयकुमार म्हसाळ)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति:-

१) श्री.कृष्णा सी. गुप्ता,
एस-१०६, पाटाडीया कॉम्प्लेक्स, जनार्दन रकवी मार्ग,
उत्तन रोड, भाईंदर (प), जि.ठाणे. ४०११०१.

२) जन माहिती अधिकारी तथा
आस्थापना अधिक्षक (आस्थापना)

३) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना) यांचे कार्यालय.